पुढारी, १५ मार्च, २०१९

# निलीमा मिश्रा यांना यंदाचा भद्रकाली ताराराणी पुरस्कार

## प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांची माहिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ताराराणी व मौनी विद्यापीठाचे संस्थापक डॉ. व्ही.टी.पाटील यांच्या २४ व्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी (दि. १७) बहादूरपूर (जि. जळगाव) येथील सामाजिक कार्यकर्त्या पद्मश्री निलीमा चंद्रशेखर मिश्रा यांना २०१८-१९ चा 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यावर्षीचा पुरस्कार निलीमा मिश्रा यांना सिक्कीमचे माजी राज्यपाल डॉ. श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार प्रदान समारंभ दि.१७ रोजी व्ही. टी. पाटील स्मृती भवन येथे सकाळी ११ वाजता होणार आहे. ५१ हजार रुपये रोख, शाल-श्रीफळ, गौरवपत्र, भद्रकाली ताराराणीचे स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

**शंभरहून अधिक बचत गटांची स्थापना**

जळगाव जिल्ह्यात गेली २० वर्षे ग्रामीण भागाच्या विकासासाठी सामाजिक कार्यकर्त्या निलीमा मिश्रा यांनी विशेषत: ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनविण्यासाठी शंभरहून अधिक बचत गटांची स्थापना केली आहे. दर्जेदार अंगणवाडी व बालवाडी उभारणी, शिवण उद्योग, पोषण आहार प्रकल्प, गोधडी निर्मिती उद्योग, शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती प्रकल्प, निरोगी आरोग्यपूर्ण गावांची निर्मिती, शेतमालास परदेशी बाजारपेठ यासारखे अनेक उपक्रम त्यांनी राबविले आहेत.